**नियमित दिवाणी दावा क. २०/२०१३ नि. २३ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज निशाणी क. २३ हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरूस्ती साठी दाखल केलेला आहे.

२. वादीने अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी नं. १ याने लेखी कैफीयतीच्या परिच्छेद क. ५ मध्ये प्रतिवादी नं. १ चे भाउ श्री. बाळाराम दासगांवकर उर्फ देसाई यांनी सन २०००-०१ च्या सुमारास ग्रामपंचायत मुमुरशी, ता. महाड, जि. रायगड येथे शासनाचे अनुदान घेवून त्या ठिकाणी शौचालय व गोबर गॅस चे बांधकाम केलेले आहे असे कथन केल्यामुळे श्री. बाळाराम दासगांवकर उर्फ देसाई यांना प्रतिवादी पणांत सामील करणे न्यायाचे व गरजेचे आहे. श्री. बाळाराम दासगांवकर उर्फ देसाई यांना दाव्यांत प्रतिवादी पणांत सामील न केल्यास वादीचे अपिरीमीत नुकसान होईल व त्यांना दाव्यांत सामील केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब प्रस्तावीत दुरूस्ती मंजूर होण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी नं. १ ने निशाणी क. २३ कडे लेखी म्हणणे दाखल करून वादीच्या दुरूस्ती अर्जास अशी हरकत घेतली की, वादीने प्रस्तुतचा अर्ज सुमारे अडीच वर्षाच्या विलंबाने दाखल केला असल्यामुळे तो मुदतबाह्य आहे. प्रस्तावीत दुरूस्ती मुळे दाव्यांच्या स्वरूपात फरक पडणार असल्यामुळे दुरूस्तीस परवानगी देणे योग्य होणार नाही.

४. वादीचे वकील व प्रतिवादी नं. १ चे वकील दोन्ही गैरहजर. प्रस्तुत अर्ज हा दि. १६/०३/२०१६ रोजी दाखल केलेला असल्यामुळे वादी व प्रतिवादीच्या वकीलांच्या युक्तीवादाविना गुणदोषावर निकाली

काढण्यासाठी सुनावणीस घेतला.

५. निशाणी क्र २३ व त्यावरील लेखी म्हणणे यावरून खालील मुद्दे माझ्या निष्कर्षनार्थ निर्माण होतात त्यावर मी माझे निष्कर्ष त्यावरील कारणेमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित वाद पत्रातील दुरूस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्यातील खराखुरा वाद अभिनिर्णीत करण्यासाठी आवश्यक आहे काय ? | होय. |
| २. | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणेमिमांसा

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींनी वादीच्या जागेत अतिक्रमण केले आहे असे ठरवून मिळण्यासाठी व सदरचे अतिक्रमण काढून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं. १ याने त्याच्या कैफीयतीमध्ये दावा मिळकत ही त्याचा भाउ बाळाराम दासगांवकर उर्फ देसाई याने सन २०००-०१ च्या सुमारास ग्रामपंचायत मुमुरशी यांचेकडून शासनाचे अनुदान घेवून शौचालय व गोबर गॅसचे बांधकाम केल्याचे कथन केल्याचे दिसून येते. प्रतिवादी नं. १ च्या बचावानुसार अतिक्रमण हे प्रतिवादी नं. १ चा भाउ बाळाराम दासगांवकर उर्फ देसाई याने केल्याचे कथन केल्यामुळे प्रतिवादी नं. १ चा भाउ बाळाराम दासगांवकर उर्फ देसाई हा प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादीपणांत सामील करणे हे प्रस्तुत दाव्यांतील अतिक्रमण घोषित करण्यासाठी व अतिक्रमण काढून मिळण्यासाठी ज्याद्वारे वादी व प्रतिवादी यांच्यामधील ख-याखु-या वादाचे निराकरण होईल असे न्यायालयाचे मत आहे.

७. प्रतिवादी नं. १ ची अशी हरकत आहे की, वादीने दुरूस्ती अर्ज मुदतीमध्ये दाखल केलेला नसल्यामुळे तो मुदतबाह्य आहे. दि.प्र. सं. आदेश ६ नियम १७ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दुरूस्ती अर्ज दाखल करण्यासाठी निश्चित असा कालावधी नमूद केलेला नाही परंतू दुरूस्ती अर्ज हा दाव्याची सुनावणी सुरू झाल्यानंतर मंजूर करता येत नाही. प्रस्तुत दाव्यामध्ये दाव्यांची सुनावणी अद्याप सुरू झालेली नाही. सबब प्रतिवादी नं. १ चा मुदतीचा बचाव तग धरणारा दिसून येत नाही.

८. वादीने मागितलेली प्रस्ताविक दुरूस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्यातील खराखुरा अतिक्रमणाचा वाद अभिनिर्णीत करण्यासंबंधी असल्यामुळे मंजूर करणे आवश्यक आहे तसेच प्रस्ताविक दुरूस्ती मान्य केल्यास दावा मिळकतीच्या वाद विषयांत व स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. सबब मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवत आहे व मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादी चा अर्ज निशाणी क्र. २३ मंजूर करण्यांत येत आहे.

२. वादीस प्रतिवादी नं. ७ म्हणून श्री. बाळाराम नारायण दासगांवकर उर्फ देसाई यांस प्रतिवादीपणात सामील करण्यांस परवानगी देण्यांत येते व वादीने त्या अनुषंगाने दावा दुरूस्ती करण्यांस परवानगी देण्यांत येते. वादीने सदरची दुरूस्ती ही पुढील तारखेपर्यंत करावी व दुरूस्ती केल्यानंतर दुरूस्त दाव्याची प्रत दाखल करावी.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च हा दाव्यांतील खर्च राहील.

ठिकाण – महाड (वि. रा. डोईफोडे)
दि. ११/०९/२०१९ सह दि. न्या, क. स्तर, महाड